संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

## विद्यापीठाचा पर्यावरण व संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार जाहीर
## २४ फेब्रुवारी रोजी होणार प्रदान

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पर्यावरण पुरस्कार २०१९ व कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृति प्रित्यर्थ दिला जाणारा श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०१९ जाहीर झाला असून दि. २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दुपारी १२.०० वाजता विद्यापीठ दृकश्राव्य सभागृह येथे प्रदान होणार आहे. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली होणाऱ्या पुरस्कार वितरण समारंभाला क्रांतीवीर चाफेकर स्मारक समिती, पुणेचे अध्यक्ष डॉ. गिरीष यशवंत प्रभुणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, दानदाते डॉ.व्ही.एम. मेटकर उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते दोनही पुरस्कार प्रदान होतील.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा 'पर्यावरण पुरस्कार' २०१९ जाहीर झाला असून यावर्षी संस्थागटात श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर, जि. अकोला यांना जाहीर झाला आहे. पंधराहजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व.द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृति प्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार - २०१९' यावर्षी गाडगे बाबा मंडळ, दर्यापूरचे अध्यक्ष प्रा. गजानन रामकृष्ण भारसाकळे यांना घोषित झाला आहे. दहा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

तरी या पुरस्कार वितरण कार्यक्रमाला प्राचार्य, समाजसेवक, शहरातील गणमान्य नागरिक व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व विद्यापीठाच्या पर्यावरण पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. प्रफुल्ल गवई यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १८/०२/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी